**मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र,नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील -**

**अपील क्रमांक १३८३/२००७**

**१) श्री ओमप्रकाश यशवंत सुरवाडे**
**मु.पो. बखाडी, ता. बाळापूर, जि. अकोला** **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

**२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा कुलसचिव**
**संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती-४४४६०२.**

**३) जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य**
**कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, बाळापूर**
**ता. बाळापूर, जिल्हा अकोला.** **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक १८.७.२००८ )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ४.१२.२००६ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम, १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केली आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी गैरहजर आहे.

अपीलकर्ता यांनी दिनांक १०.६.२००६ रोजी प्राचार्य, कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, बाळापूर यांचेकडे शासकिय माहिती अधिकारी म्हणून खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

**आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन** : " १. U.G.C. कडून प्राप्त व खर्च केलैल्या अनुदानाच्या विषयनिहाय तपशिल.

२. संस्थेचा बॅकलॉग न भरण्याची कारणे

३. सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या सेवापुस्तकांच्या सत्यप्रती.

४. सर्व प्राध्यापकांच्या तक्रारी व दिलेल्या उत्तरांच्या सांक्षांकित सत्यप्रती.

५. जागेचया नमूना (८) व (५८ अहवालाच्या सत्यप्रती.

६. विद्यार्थ्यांची विषयावार संख्या.

७. भारत सरकार शिष्यवृत्ती वाटपांच्या विद्यार्थीनिहाय तपशिल."

सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक ८.८.२००६ रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. सदरच्या उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी कुलसचिव, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांचेकडे प्रथम अपील केले आहे. सदरच्या प्रथम अपीलाच्या संदर्भात दिनांक २४.९.२००६ रोजी महाविद्यालयाचे माहिती अधिका-याकडे अर्ज करावा लागेल असे कुलसचिव, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांनी कळविलेले दिसून येते. परंतु, अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपीलकर्ता यांनी दिनांक ५.४.२००८ रोजी खालीलप्रमाणे खुलासा दाखल केला आह

" मी खुलासा करतो तो येणेप्रमाणे-

१. प्राचार्याकडे माहिती मिळण्यासाठी मी. U.P.C. पोस्टाने दिनांक १०.७.२००६ रोजी अर्ज केला.

२. त्यावर दि. ८.८.२००६ ला प्राचार्याने केवळ एका मुद्यांची माहिती मिळविण्यासाठी रुपये १५००/- ची पत्राने मागणी केली.

३. त्याआधी म्हणजे दि. ७.८.२००६ ला मी कुलगुरु, अमरावती विद्यापीठ अमरावतीकडे अपील दाखल केले.

४. अमरावती विद्यापीठाने दि. १४.९.२००६ ला ते अजीलीय अधिकारी नसल्याचे पत्र मला पाठविले.

५. मी महाविद्यालयात अपीलीय अधिकारी कोण याची चौकशी केली पण मला माहिती मिळाली नाही.

६. म्हणून मी दि. ४.१२.२००६ रोजी आपणाकडे अपील दाखल केले.

७. जर कार्यालयाच्या दर्शनी भागात माहिती अधिकारी, अपीलीय अधिकारी यांचे फलक असते, तर आपणाकडे येण्याचा त्रास वाचला असता. "

उत्तरवादी यांचे तर्फे सुध्दा श्री निरज श्रीनिवास खांदेवाले यांनी वकील पत्र दाखल करुन दिनांक २१.४.२००८ रोजी खुलासा दाखल केला आहे. तो खालीलप्रमाणे आहे.

" १. That the appellant has preferred this appeal and challenged that the respondent No. २ has not furnished the required information. It is stated that appellant has submitted that he is poor person and is below poverty line. That the respondent No.२ has received the documents to demonstrate that the appellant is not a BPL person and he has misled the authorities and has stated false.

२. The respondent No.२ seeks permission to file the reply relevant documents to support the claim. Secondly it is stated that the respondent No. २ college is not receiving any grants from the UGC therefore the information about accounts of grants received from the UGC does not arise. Regarding the other information the appellant not being a person below poverty line is required to pay the cnecessary stamps and pay for the incidental expenses. The appellant having failed to do so the RTI Act does not hold the respondent No.२ responsible for any violation of the Act.

३. That the respondent No.२ has not violated any of the provisions of law. On the contrary the appellant has misguided the authorities by making false statements. The appeal therefore deserves to be dismissed ".

त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्राचे संदर्भामध्ये विचारणा केली असता अपीलकर्ता यांचे असे म्हणणे आहे की, त्यांचे प्रमाणपत्र खरे आहे. त्यावर उत्तरवादी क्रमांक २ यांनी पुन्हा शपथपत्र आयोगाकडे दाखल केले. शपथपत्राचा परिच्छेद ३ मध्ये " That the respondent No.२ has received the documents to demonstrate that the appellant is not a BPL person and he has misled the authorities and has stated falsely. The claim of the appellant that he is a Below poverty

Line (BPL) person is false and fabricated. The appellant's father is an Ex Serviceman and he receives pension from the government. The father and appellant constitute a joint family. The BPL certificate filed by the appellant is for the year १९९७-९८. There is no mention that as on today the appellant is still a BPL person. "

त्या तारखेस अपीलकर्ता हे गैरहजर आहे व त्यामुळे उत्तरवादी नंबर २ यांनी अपीलकर्ता यांना जे दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्रधारक आहे व त्यांच्या प्रमाणपत्र हे वैध आहे याबध्दल त्यांनी शपथपत्र दाखल करावे अशी आयोगाकडे विनंती केली. व त्याप्रमाणे दिनांक २५.४.२००८ रोजी अपीलकर्ता यांनी आयोगाचे आदेशाप्रमाणे आयोगाचे उपसचिव यांनी दिनांक १८.७.२००८ रोजी दुपारी २.०० वाजता उत्तरवादी यांचे वकीलांनी दाखल केलेला अर्ज व शपथपत्राची प्रत सोबत जोडून त्याप्रमाणे दारिद्रय रेषेखालील असल्याबाबत शपथपत्र सुनावणीचे तारखेला किंवा तत्पूर्वी दाखल करावे असे पत्र पाठविले आहे. परंतु, सुनावणी दुपारी २.०० ठेवण्यात आली असून सुध्दा अपीलकर्ता हे ५.०० वाजेपर्यंत आयोगाचे कार्यालयात हजर झाले नाही. व यांनी शपथपत्र सुध्दा दाखल केले नाही. व त्यामुळ सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आदेश

१) अपीलकर्ता यांनी उत्तरवादी यांच्या दिनांक २४.४.२००८ च्या अर्जाप्रमाणे व शपथपत्राप्रमाणे दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्राच्या वैधता संदर्भामध्ये शपथपत्र दाखल करावे अशी विनंती केलेली असून सुध्दा व तसे आयोगाने आदेश दिलेले असून सुध्दा शपथपत्र दाखल केलेले नसल्यामुळे व सुनावणीसही हजर झालेले नसल्यामुळे सदरचे अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) निर्णयाची एक प्रत अपीलकर्ता व उत्तरवादी यांना देण्यात यावी.

**दिनांक :-१८.७.२००८**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, नागपूर**